ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २५ नोव्हेंबर, १९५९ | अंक ४३

## विविध माहिती

**फिरती वैद्यकीय मदत**—प्रत्येक जिल्ह्यांत वैद्यकीय मदत देण्यासाठी एक फिरती मोटारगाडी ठेवण्याचा विचार मुंबई सरकार करीत आहे. ग्रामीण विभागांतील लोकांना वैद्यकीय मदत वेळेवर पोंचविण्याच्या कामीं वरील उपक्रमाचा चांगला उपयोग होईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खेडेगांवांतील लोकांच्या हिताच्या अधिक योजना सुरू करण्यांत येणार आहेत.

**अणुशक्तीच्या उपयोगाचें प्रदर्शन**—दिल्ली येथें भरविण्यांत येणाऱ्या जागतिक शेती-प्रदर्शनांत रशिआ व अमेरिका भाग घेणार आहेत. अणुशक्तीचे शांतताकालीन विविध उपयोग दाखविणारा एक खास विभाग अमेरिका प्रदर्शनांत खोलणार आहे. ह्या विभागासाठी १७,००० चौ. फूट जागा लागणार आहे. ह्या कामीं अमेरिकन शास्त्रज्ञांना हिंदी शास्त्रज्ञ मदत करीत आहेत.

**गळिताचा दीर्घ हंगाम**—श्रीरामपूर विभागांतील साखरेच्या कारखान्यांचा गळिताचा हंगाम पुढील वर्षाच्या मे महिन्यापर्यंत चालेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या भागांत गेल्या वर्षाच्या मानानें उसाच्या लागवडींत बरीच वाढ झाल्यानें हंगाम नेहमींपेक्षा दीर्घ राहणार आहे. श्रीरामपूर व कोपरगांव तालुक्यांतील १० साखर कारखान्यांनीं ऊंस गाळण्यास प्रारंभ केला आहे.

**रशिआचा प्रयोग फसला**—गेल्या वर्षी रशिआनें अग्निबाणाच्या साह्यानें माणसाला अंतराळांत पाठविण्याचा प्रयोग केला, पण अपघात झाल्यानें तो फसला अशी माहिती एका जर्मन शास्त्रज्ञानें जाहीर केली आहे. १९६५ च्या सुमारास माणसासह अंतराळांत उड्डाण करण्याच्या कामीं यश येईल असेंहि भाकित त्यानें वर्तविलें आहे.

**तिबेटमधील जमीनसुधारणा**—चीनच्या सरकारनें तिबेटमधील जमिनीचें फेरवांटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तिबेटमधील बहुतेक जमीन लामा धर्मगुरूंच्या मालकीची आहे. ज्या धर्मगुरूंनीं गेल्या मार्चमधील चीनविरोधी उठावांत भाग घेतला नव्हता त्यांना नुकसानभरपाई देण्यांत येण्याचा संभव आहे. इतर जमीनदारांना मात्र नुकसानभरपाई मिळणार नाहीं.

**युगोस्लाव्हिआच्या नर्तकांची भेट**—पुढील महिन्यांत युगोस्लाव्हिआंतील नर्तकांचा एक संच भारताचा दोन आठवड्यांचा दौरा करणार आहे. नर्तकांच्या संचांत एक प्रसिद्ध गायिकाहि आहे. ह्या पथकांत लोकनृत्यांत पटाईत असलेले ५० नर्तक आहेत. भारतांत आपल्या नृत्याचे १५ कार्यक्रम ते करतील. कार्यक्रमांचें उत्पन्न पंतप्रधानांच्या मदत-फंडाला दिलें जाईल.

**राष्ट्रीय आरोग्य योजनेचा दुरुपयोग**—ब्रिटनमधील एका डॉक्टरानें राष्ट्रीयीकरण झालेल्या आरोग्य योजनेचा ब्रिटनमधील रोगी दुरुपयोग करीत आहेत असा आरोप केला आहे. ह्या विषयावर त्यानें एक निनांवी पुस्तकच लिहिलें असून फुकट अगर अल्प किंमतींत मिळणाऱ्या वैद्यकीय मदतीचा गैरफायदा घेतल्याचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत.

**मध्यप्रदेशाचा तिसरा कार्यक्रम**—मध्यप्रदेश राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ४०० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. कार्यक्रमांत शेतीच्या उत्पादनांत वाढ करणें व सहकारी संस्थांची स्थापना करणें ह्यावर विशेष जोर देण्यांत येणार आहे. त्याशिवाय व्यापार व उद्योगधंद्यांच्या विकासालाहि अधिक महत्त्व देण्यांत येणार आहे.

**नव्या कारखान्यासाठीं जागा**—कालिकतपासून तेरा मैलांवर बिर्ला गटाची रेनॉय पल्प फॅक्टरी काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठीं जागा ताब्यांत घेण्याचा हुकूम केरळ सरकारनें काढला आहे. कारखान्यासाठीं एकूण १३६ एकर जागा लागणार असून त्यासंबंधीं कायदेशीर व्यवस्था करण्यासाठीं एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली आहे.

**नाट्यगृह बांधण्याची योजना**—आंध्र राज्याच्या संगीत नाटक ॲकॅडमीनें एक खुलें नाट्यगृह व एक बंदिस्त नाट्यगृह बांधण्याचें ठरविलें आहे. बंदिस्त नाट्यगृहांत १,५०० प्रेक्षक बसण्याची सोय करण्यांत येणार असून खुल्या नाट्यगृहांत ३,००० प्रेक्षकांची बसण्याची सोय करण्यांत येणार आहे. दोन्ही नाट्यगृहांसाठीं मिळून १२ लाख रु. खर्च येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## कंपनी कायद्याचें १५५ वें कलम

### झटपट स्वरूपाच्या कारवाईची मर्यादा

### ( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

१९४७ सालीं शांताराम आणि जयश्री या तेव्हांच्या पतिपत्नींनीं राजकमल कलामंदिर, प्रायव्हेट लिमिटेड, या नांवाची एक कंपनी काढली. त्या कंपनींत जयश्रीचे २५१ सर्वसाधारण शेअर आहेत अशी नोंद करण्यांत आली. ता. १ जुलै १९५५ पर्यंत जयश्री आणि शांताराम हे दोघेहि त्या कंपनीचे डायरेक्टर होते.

कोर्टांत ॲफिडेव्हिटबरोबर जोडलेल्या ता. २८ जून १९५५ च्या हस्तांतराच्या कागदपत्रावरून असें दिसून येतें कीं, वरील २५१ शेअरचें हस्तांतर करणाऱ्या दस्तऐवजावर जयश्रीची सही आहे. कंपनीच्या शेअरच्या रजिष्टरांत ता. १ जुलै १९५५ रोजीं हे शेअर रिस्पाँडंट नं. २ च्या नांवानें हस्तांतर केल्या गेले. ता. १ जुलै १९५५ तारखेच्या डायरेक्टरांच्या सभेच्या मिनिट-वरून असें दिसून येतें कीं, त्या सभेला जयश्री आणि शांताराम हे दोघेहि हजर होते आणि जयश्रीचे २५१ शेअर्स रिस्पाँडंट नं. २ च्या नांवानें हस्तांतर करण्याकरितां केलेला अर्ज मंजूर करण्यांत येऊन त्याप्रमाणें त्या शेअर्सचे रिस्पाँडंट नं. २ च्या नांवानें हस्तांतर करण्यांत आलें.

तारीख १ जुलै १९५५ पासून जयश्री आणि शांताराम यांच्यांत मतभेद सुरू झाले आणि जयश्रीनें कंपनी आणि शांताराम यांचेविरुद्ध दावा आणला. त्या दाव्यांतील लेखी जबाबांत ता. १ जुलै १९५५ ला भरलेल्या डायरेक्टरांच्या सभेच्या मिनिटसूचा निर्देश करण्यांत आला आणि सोबत ते मिनिटस् जोडण्यांत आले.

जयश्रीने हायकोर्टाच्या ओरीजनल साइडला अर्ज केला. ता. १ जुलै १९५५ रोजीं डायरेक्टरांची सभा झालीच नाहीं आणि अर्थात्च आपण त्या सभेला हजर नव्हतों असें अर्जदाराचें म्हणणें होतें. सभेचें मिनिटस् खोटें असून आपले शेअर्स आपणापासून हिरावून घेण्याच्या उद्देशानें खोटें मिनिटस् तयार करण्यांत आलें असून आपण आपल्या शेअर्सचे रिस्पाँडंट नं. २ च्या नांवानें कधींच हस्तांतर केलें नव्हतें असें अर्जदाराचें म्हणणें होतें. हस्तांतराच्या दस्तऐवजावरील सही आपली नाहीं असें अर्जदाराचें म्हणणें नव्हतें. परंतु त्या दस्तऐवजांतील मजकूर खोटा आहे असें तिचें म्हणणें होतें. हीं विधानें खरीं नाहींत असें कंपनीतर्फे करण्यांत आलेल्या ॲफिडेव्हिटमध्यें सांगण्यांत आलें.

हायकोर्टांत कंपनीतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, कंपन्यांच्या कायद्याच्या क. १५५ खालील कारवाई हा एक झटपट स्वरूपाचा उपाय असून या मामल्यांत उद्भवलेल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा निकाल करण्याकरितां त्या उपायाचा अवलंब करण्यांत येऊ देऊं नये. खोटी सही अथवा खोटे दस्तऐवज यांच्यासारखे प्रश्न क. १५५ खालील कारवाईचा अवलंब करून निकालांत काढणें योग्य नाहीं असें कंपनीचें म्हणणें होतें.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला. कंपन्यांच्या कायद्या-खाली उद्भवलेल्या प्रश्नांच्या बाबतींत मुंबई हायकोर्टाचा नियम असा आहे कीं, या प्रश्नासंबंधीचा अर्ज पिटिशनद्वारां केला पाहिजे. मात्र प्रश्न जर गुंतागुंतीचे असतील आणि त्यासंबंधी जर दुसरा उपाय अर्जदाराला मोकळा असेल तर त्याकरितां पिटिशनच्या मार्गाचा अवलंब करणें योग्य नाहीं. दस्तऐवजांची तलाशी आणि परीक्षण ( Discovery and Inspection ) यांची जेव्हां आवश्यकता असेल आणि खोटी सही अथवा खोटे दस्तऐवज यांच्यासारखे गुंतागुंतीचे प्रश्न जर उद्भवतील तर त्या प्रश्नांच्या निकालाकरितां कंपन्यांच्या कायद्याच्या क. १५५ खालील झटपट कारवाईच्या मार्गाचा अवलंब करण्यांत येऊं नये. प्रस्तुत मामल्यांत अर्जदाराला दुसरा मार्ग मोकळा नाहीं असें म्हणतां येत नाहीं. कंपनी शेअर रजिस्टर दुरुस्त करण्यांत यावें याकरितां ती दावा आणूं शकते. प्रस्तुत मामल्यांत खरा वाद अर्जदार आणि तिचा पूर्वीचा पती शांताराम यांच्यांत आहे आणि खोटी सही करणें अथवा खोटे दस्तऐवज करणें यांच्या-सारखे गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत कंपन्यांच्या कायद्याच्या क. १५५ खालील झटपट कारवाईचा अवलंब अर्जदाराला करण्यांत येऊ देऊं नये आणि जरूर वाटल्यास तिनें दावा आणावा असा निकाल देऊन हायकोर्टानें अर्ज नामंजूर केला.

#### सारांश

कंपन्यांच्या कायद्याच्या क. १५५ खालील कारवाई झटपट स्वरूपाची आहे. दस्तऐवजांची तलाशी आणि परीक्षण ( Discovery and Inspection ) जर आवश्यक असेल आणि खोटी सही करणें अथवा खोटे दस्तऐवज करणें यांच्यासारखे गुंतागुंतीचे प्रश्न जर उद्भवणार असतील तर त्यांच्या निकाला-करितां कंपन्यांच्या कायद्याच्या क. १५५ खालील झटपट उपायाचा अवलंब करण्यांत येऊ देऊं नये.

---

### वाचनालयें व ग्रंथालयें यांच्या चालकांना जाहीर विनंती

श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय संस्थेस आतां ४० वर्षे पूर्ण होऊन ४१ वें वर्ष लागलें आहे. या निमित्तानें होणाऱ्या वार्षिक समारंभाबरोबर वाचनालयें व ग्रंथालयें यांच्या अहवालाचें एक प्रदर्शन पुणें येथें डिसेंबर १९५९ मध्यें भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत वार्षिक अहवाल, रिपोर्टस्, माहितीपत्रकें, इतिवृत्त, इतिहास, रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव, हीरकमहोत्सव, शताब्दीमहोत्सव ग्रंथ व छायाचित्रें यांचा समावेश आहे.

तरी अखिल महाराष्ट्रांतील सर्व वाचनालयें व ग्रंथालयें यांच्या चालकांनीं स्मरणपूर्वक या प्रदर्शनांत भाग घेऊन प्रदर्शन यशस्वी करावें व जनतेला आपल्या संस्थेची माहिती या प्रदर्शनाद्वारें घेण्याचा सुयोग घडवावा. पत्रव्यवहार खालील ठिकाणीं व्हावाः— ५११ बुधवार पेठ, पुणें २.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिटा यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा :- फोर्ट · दादर · माहिम · परळी · पुणें · बेळगांव
महिला शाखा :- सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४

# अर्थ

बुधवार, ता. २५ नोव्हेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औद्योगिक उत्पादनांत होत असलेली वाढ

उद्योगधंद्यांबाबत सल्ला देणाऱ्या मध्यवर्ती कौन्सिलच्या स्थायी समितीसमोर बोलतांना भारताचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा म्हणाले कीं, ह्या वर्षी उद्योगधंद्यांतल्या उत्पादनांत सावकाश पण एकसारखी वाढ होत आहे. १९५८ सालीं उत्पादनांत बरीच घट झाली होती. पण उत्पादनाचा वेग आतां पुन्हां वाढत चालला आहे. कांहीं प्रमुख उद्योगधंद्यांनीं उत्पादनाबाबत उचल खाल्ल्यामुळें उत्पादनांत वाढीची प्रवृत्ति दिसून येत आहे. कापड, पोलाद, मोटारी, ह्या धंद्यांतील उत्पादन वाढत आहे. त्याशिवाय यांत्रिक हत्यारें, औद्योगिक यंत्रसामग्री, ह्या धंद्यांच्या उत्पादनांतहि वाढ झालेली आहे. रासायनिक कारखाने, कांच कारखाने, सिमेंटचे कारखाने, औषधांचे कारखाने, ह्यांच्याहि उत्पादनांत वाढ झालेली आहे. १९५८ सालीं औद्योगिक उत्पादनवाढीचा वेग २·४ होता. १९५७ सालीं तो ४·७ होता आणि १९५६ सालीं १०·२ होता. औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १९५८ सालीं १३९·७ होता, १९५७ सालीं तो १३७·३ होता व १९५६ सालीं १३२·६ होता. (निर्देशांकांचें पायाभूत वर्ष १९५१ = १००). चालू वर्षीं औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १४८ वर येईल असा अंदाज आहे. चालू वर्षाच्या अखेरच्या तिमाहींतहि उत्पादन वाढतच असल्यामुळें उत्पादनाचा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. यांत्रिक हत्यारें तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांतील उत्पादनाचा निर्देशांक ६९६ आहे, औद्योगिक यंत्रसामग्रीच्या उद्योगधंद्याचा ४२९ आहे, आणि विजेच्या यंत्रसामुग्रीचा ३०२ आहे, ही समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे.

उद्योगधंद्यांचा पृथक्पणें विचार करतां पुढील उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढल्याचें दिसून येतें. यांत्रिक हत्यारें, शिवणाचीं यंत्रें, डिझेल एंजिनें, विजेचे पंखे, सायकली, कॉस्टिक सोडा, कागद, टायर्स व ट्यूब्स. गेल्या वर्षी सिमेंटच्या कारखान्यावर मंदीची सावली पडली होती. पण आतां त्यांची परिस्थिति सुधारली आहे. उत्पादनाचा वेग १० टक्क्यांनीं वाढलेला आहे. लोकांना रोज लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांच्या उत्पादनाची परिस्थितीहि बहुतेक ठिकाणीं सुधारली आहे. अर्थात् ह्याला कांहीं कारखाने अपवाद आहेत. साखरेच्या बाबतींत मात्र परिस्थिति जरा गोंधळाची आहे. गेल्या वर्षी साखरेच्या उत्पादनांत घट झालेली होती. ह्या वर्षी उत्पादन अजून पूर्वीप्रमाणें होऊं लागलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण, सरकारनें साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी नवीन उपाय योजले आहेत. त्यांचा परिणाम अपेक्षेप्रमाणें चांगला होऊन साखरेचें उत्पादन इतर रोख खपाच्या वस्तूंप्रमाणेंच वाढूं लागेल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. त्याशिवाय तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणखी साखर कारखाने काढण्यासाठी परवाने देण्यांत आले आहेत. सध्या सरकारनें सर्व प्रकारच्या कारखान्यांना मोकळेपणानें परवाने देण्याचें व भांडवली स्वरूपाचा माल आयात करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. त्यामुळें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत सर्व उद्योगधंदे त्यांच्यासाठी ठरविण्यांत आलेलीं उद्दिष्टें गाठतील, असें वाटतें. कांहीं उद्योगधंदे तर उद्दिष्टांच्यापेक्षाहि अधिक उत्पादन करतील असें दिसतें. दुसऱ्या कार्यक्रमाच्या कालांत आजच कांहीं उद्योगधंदे त्यांच्या कमाल उत्पादनक्षमतेपर्यंत आणि उद्दिष्टांच्याहि पलीकडे पोंचल्याचें दिसून येत आहे. ही प्रगति आशादायक आहे, असें मानण्यास हरकत नाहीं.

---

## टॅरिफ कमिशनच्या कार्याचें स्वरूप

भारताच्या टॅरिफ कमिशनचे अध्यक्ष श्री. रामसुब्बन नुकतेंच सेवानिवृत्त झाले. त्यांनीं कमिशनच्या कामकाजाविषयीं उद्बोधक माहिती सांगितली आहे. टॅरिफ कमिशन ही कायद्यानें स्थापन करण्यांत आलेली एक संस्था आहे. तिला अधिकारहि व्यापक आहेत. आपल्यासमोर पुरावा देण्यासाठी समन्स काढण्याचा अधिकारहि टॅरिफ कमिशनला असतो. टॅरिफ कमिशनवर अध्यक्षासकट ५ सभासद असतात. पण सर्व सभासदांच्या जागा नेहमींच भरलेल्या असतात असें नाहीं. टॅरिफ कमिशननें केलेल्या शिफारसी सरकारवर बंधनकारक नसल्या तरी त्यामुळें त्याच्या मताच्या अधिकृतपणांत कमीपणा येतो असें मात्र नाहीं. लोकशाही राजवटींत ह्या तत्त्वाप्रमाणें कांहीं संकेत ठरविण्यांत येतात.

टॅरिफ कमिशननें गेल्या सात वर्षांत उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याच्या कामीं १४० चौकशा केल्या म्हणजे दरसाल २० चौकशा असें प्रमाण पडतें. टॅरिफ कमिशनतर्फे होणाऱ्या चौकशा, मग त्या मोठ्या धंद्यासंबंधीं असोत अगर छोट्या धंद्यासंबंधीं असोत, अगदीं तपशीलवार असतात. प्रत्येक चौकशी पूर्ण होण्यास तीन ते चार महिने चांगलें भरपूर काम करावें लागतें. नुसती प्रश्नावली तयार करण्यासच एक ते दीड महिना लागतो. कमिशनच्या कामाविषयीं कांहीं विलक्षण कल्पना रूढ झालेल्या दिसतात. त्यांपैकीं एक म्हणजे ज्या धंद्याबद्दल चौकशी होत असेल त्याला संरक्षण आपोआप मिळतेच ही होय. पण तसें नाहीं. टॅरिफ कमिशन उद्योगधंद्यांच्या हिताप्रमाणेंच ग्राहकांच्या हिताचाहि विचार करते. तसें पाहिलें तर कमिशनचें मुख्य काम विरोधी हितसंबंधांची सांगड घालण्याचेंच आहे. कमिशनच्या कामाला मार्गदर्शन करण्यासाठी निश्चित असे नियम नाहींत. खुद्द टॅरिफ कमिशन कायद्यांतहि उद्योगधंद्यांकडून करण्यांत येणाऱ्या संरक्षणाच्या मागण्यांचा विचार कशा तऱ्हेनें करण्यांत यावा ह्याबद्दल दिशा दाखविलेली नाहीं. तथापि अनुभवावर आधारलेले कांहीं संकेत असावेत असें वाटतें. सामान्यपणें फिस्कल कमिशन रिपोर्टांत बरेंच मार्गदर्शन केलेलें आहे. ह्या अहवालांत कोणत्या अटींवर उद्योगधंद्यांना संरक्षण दिलें जावें तें विशद केलेलें आहे. कांहीं विवक्षित कालानंतर आपल्या पायावर उभें राहूं शकणाऱ्या उद्योगधंद्यालाच

संरक्षण मिळण्याचा हक्क सामान्यतः पोंचतो आणि संरक्षणाचा मुख्य उद्देश परदेशांच्या स्पर्धेपासून देशी उद्योगधंद्यांना वाचविण्याचा असतो. संरक्षण दिल्यानंतरहि एखादा उद्योगधंदा अंतर्गत स्पर्धेला तोंड देऊं शकत नसल तर अशा उद्योगधंद्याला संरक्षण देण्यांत कांहींच अर्थ नाहीं हें उघड आहे. टॅरिफ कमिशनपुढें येणाऱ्या प्रश्नांत सर्वांत नाजुक प्रश्न घसारा काढण्याच्या पद्धतीविषयींचा आहे. सर्वच उद्योगधंद्यांना घसारा काढण्याबद्दल एकाच मापानें मोजून चालणार नाहीं. उदाहरणार्थ, रासायनिक व एंजिनिअरिंगचे उद्योगधंदे. ह्यांच्या यंत्रसामुग्रीची झीज फार लवकर होते. म्हणून त्यांना घसाऱ्याचें प्रमाण अधिक मंजूर केलें पाहिजे. मध्यवर्ती सरकारनें व नियोजन समितीनें ह्या प्रश्नाचा गंभीरपणें विचार करावा व घसारा काढण्याच्या दृष्टीनें उद्योगधंद्यांचें वर्गीकरण करावें अशी सूचना करण्यांत आली आहे.

## उनाड निग्रो मुलीची प्रचंड मिळकत

### टेनिसच्या खेळाचा प्रभाव!

जगांतील सर्वश्रेष्ठ महिला टेनिसपटु कु. अल्थिया गिब्सन, हिनें चार महिन्यांसाठी सुमारें ५,००,००० रुपयांच्या मोबदल्यांत धंदेवाईक खेळाडू होण्याचें मान्य केलें आहे. न्यूयॉर्कमधील निग्रो मोहोल्यांत, उनाडपणांत वाढलेल्या ह्या ३२ वर्षांच्या मुलीनें १९५७ व १९५८ मध्यें विंबल्डन येथील जागतिक सामन्यांत अजिंक्यपद मिळविलें होतें. नंतर, आत्मचरित्र लिहिण्यासाठी व गायनाचे जलसे करण्यासाठी ती टेनिसमधून कांहीं काळ निवृत्त झाली. तिला धंदेवाईक खेळाडू म्हणून आतां मिळावयाचा मोबदला आजवर कोणत्याहि स्त्री किंवा पुरुष टेनिस धंदेवाईकाला मिळालेल्या मोबदल्यापेक्षा अधिक आहे. प्रत्येक सामन्यास सुमारें ५,००० रु., असें तिच्या मोबदल्याचें प्रमाण पडतें. तिची ह्या चार महिन्यांच्या दौऱ्यांतील प्रतिस्पर्धी कु. कॅरोल फ्लॅगेरॉस, हीहि धंदेवाईक टेनिसपटु झाली असून तिला चार महिन्यांसाठी मिळून १,५०,००० रु. मिळतील. प्रत्येक सामन्यास सुमारें १,५०० रु. मोबदला असें तिच्या मिळकतीचें प्रमाण पडतें. ह्या दोघीजणी अमेरिकेंतील ९० शहरांत टेनिसचे सामने खेळतील.

## साखर कारखान्यांसाठी उसाच्या खरेदीचे दर

मुंबई सरकारनें भारत सरकारशीं विचारविनिमय करून १९५९-६० या वर्षांत, निरनिराळ्या कारखान्यांनीं त्यांच्या फाटकांपर्यंत पोंचता केलेल्या उसाकरितां टनामागणिक द्यावयाचें एकूण किमान मूल्य निश्चित केलें आहे.

एकूण किमान किंमती पुढें देण्यांत आल्या आहेत:—

बेलापूर कंपनी लिमिटेड, हरीगांव, जिल्हा—अहमदनगर—रु. ५५. बेलवंडी शुगर फॉर्म प्रायव्हेट लि, बेलवंडी, जि.—अहमदनगर, रु. ५२. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, श्रीपूर, जिल्हा—सोलापूर—रु. ५३. चांगदेव शुगर मिल्स पुणतांबा, जिल्हा—अहमदनगर—रु. ५३. गंगापूर साखर कारखाना, रघुनाथ नगर, जिल्हा—औरंगाबाद—रु. ५२. गोदावरी साखर कारखाना, लक्ष्मीवाडी, जिल्हा—अहमदनगर—रु. ५३. गोदावरी साखर कारखाना, साखरवाडी, जिल्हा—अहमदनगर—रु. ५२. कोल्हापूर साखर कारखाना, कोल्हापूर—रु. ५६. महाराष्ट्र साखर कारखाना, टिळक नगर, जिल्हा—अहमदनगर—रु. ५४. फलटण साखर कारखाना. साखरवाडी, जिल्हा—उत्तर सातारा—रु. ५५. रावळगांव शुगर फॉर्म, रावळगांव, जिल्हा—नाशिक—रु. ५२. सासवड माळी साखर कारखाना, माळीनगर, जिल्हा-सोलापूर—रु. ५३. व वालचंद नगर शुगर इंडस्ट्री, वालचंदनगर, जिल्हा पुणें—रु. ५४.

## भांडवल गुंतवणुकीसंबंधीं माहिती-केंद्र

भारतामधील भांडवल गुंतवणुकीसंबंधीं एका माहिती-केंद्राची स्थापना करण्याचें घाटत आहे. ह्या कामीं इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशननें पुढाकार घेण्याचें ठरविलें असून आंतरराष्ट्रीय तांत्रिक-साह्य समिति आणि भारत सरकार ह्यांचें सहाकार्य कॉर्पोरेशनला लाभणार आहे. ह्या माहिती केंद्राची कचेरी बहुधा मुंबईमध्यें स्थापन करण्यांत येईल. परदेशीय भांडवलदारांना जी माहिती लागते ती गोळा करण्याचें काम कचेरीकडे सोंपविण्यांत येईल. विशेषतः देशांतील सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति, कच्च्या मालाची उपलब्धता, मजुरांची उपलब्धता, उद्योगधंद्यांसाठी परवाने मिळविण्याची पद्धत, परदेशीय चलन मिळविण्याच्या सोयी, करपद्धति, इत्यादि बाबतींत माहिती गोळा करण्यांत येईल. मुंबईतील कचेरीची संघटना योग्य प्रकारें झाल्यावर कांहीं प्रगत देशांतील शहरांतून आणखी शाखा उघडण्यांत येण्याचा संभव आहे. अमेरिका, स्वित्झरलंड, पश्चिम जर्मनी, जपान, इत्यादि देशांतील मोठ्या शहरांतून अशा दुय्यम शाखा उघडण्यांत येतील. मध्यवर्ती माहिती केंद्र केवळ माहितीच गोळा करून थांबणार आहे असें नाहीं. भारतामधील कारखाने व परदेशांतील कारखाने ह्यांचे संबंध जोडून देण्याचें कामहि केंद्रातर्फे करण्यांत येईल. कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गगनविहारी मेहता नुकतेंच परदेशांच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत आंतरराष्ट्रीय तांत्रिक-साह्य समिति व अमेरिकेचें व्यापारखातें ह्यांच्याशीं ह्याबाबतींत चर्चा केलीच आहे. पण त्याशिवाय अमेरिकेंतील खाजगी भांडवलदार व बँकांचे प्रतिनिधी ह्यांच्याशींहि विचारविनिमय केला आहे. इतर कांहीं पाश्चिमात्य देशांशींहि श्री. मेहता ह्यांनीं विचारांची देवाण-घेवाण केली आहे.

## कोलंबो योजनेची आशादायक प्रगति

मध्य जाव्हामधील जोगजाकार्ता येथें कोलंबो योजनेची परिषद् दोन आठवडेपर्यंत चालली होती. कोलंबो योजनेप्रमाणें आर्थिकदृष्ट्या अप्रगत असलेल्या देशांना जी मदत करण्यांत आली तिचा आढावा परिषदेंत घेण्यांत आला. परिषदेला २१ देशांचे ज्येष्ठ व अनुभवी प्रतिनिधी गेलेले होते. त्यांत कांहीं प्रतिनिधी मदत घेणाऱ्या वसाहतींचेहि होते. परिषदेच्या अखेरीस काढण्यांत आलेल्या पत्रकांत दक्षिण व आग्नेय आशियांत कोलंबो योजनेच्या साहाय्यानें गेल्या कांहीं वर्षांत जी आर्थिक प्रगति करण्यांत आली आहे, तीबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें आहे. ह्या भागांतील आर्थिक विकासाचा वेग एकंदरीनें बराच वाढल्याचें पत्रकांत नमूद करण्यांत आलें आहे. तथापि, योजनेचा जो वार्षिक अहवाल तयार करण्यांत आला आहे त्यांत इषाराहि देण्यांत आलेला आहे. अहवालाच्या ह्या प्रकरणांत असें म्हटलें आहे कीं पुढील कामाच्या बाबतींत सर्वांत मोठी आव्हान देणारी गोष्ट म्हणजे संबंधित भागांतील बऱ्याच देशांतील कमालीचें दारिद्र्य आणि लोकसंख्येची भरमसाठ वाढ होय. पाकिस्तानपासून फिलिपाइन्सपर्यंतच्या भूभागांत रहाणीचें मान पश्चिम युरोपच्या मानानें अतिशय खालच्या पातळीवर आहे. आर्थिकदृष्ट्या केवळ टिकून राहण्यासाठी आणि सुधारण्यासाठी आशिआ खंडाला अद्याप दीर्घकाल धडपड करावी लागणार आहे. कोलंबो मदत-योजनेची मुदत १९६६ पर्यंत वाढविण्यांत आली आहे. मुदत आणखी वाढविण्याचा विचार १९६६ सालीं पुन्हां करण्यांत येणार आहे. मदत घेणाऱ्या देशांतील लोकांच्या दरडोई उत्पन्नांत खरीखुरी वाढ झाल्याचें मुद्दाम नमूद करण्यांत आलें आहे. ही वाढ मुख्यतः गेल्या वर्षी झालेली दिसून आली.

## लहान उद्योगांच्या कर्जांना हमी

### बँकांचें नुकसान कांहीं अंशीं सरकार सोसणार

हैद्राबाद येथें जुलै, १९५९ मध्यें लहान उद्योगधंद्यांच्या भांडवल पुरवठ्याविषयीं एक चर्चात्मक बैठक भरविण्यांत आली होती. त्या बैठकींतील सूचनांना अनुसरून रिझर्व्ह बँकेनें एक योजना तयार केली आहे, ती १९६० च्या प्रारंभीं अंमलांत येईल. ही गॅरंटी योजना पहिल्या वर्षी २१ जिल्हे व्यापील. ह्या २१ जिल्ह्यांतील व्यापारी बँक कचेऱ्या व केंद्रीय बँका ह्यांना प्रस्तुत योजना लागू होईल. ह्या संस्थांनीं लहान उद्योगांना ( ५ लक्ष रुपयांपेक्षा कमी भांडवल गुंतलेल्या उद्योगांना ) दिलेल्या सर्व प्रकारच्या कर्जांना त्यांत वाव असेल. लहान उद्योगधंद्यांना कर्जें दिल्यामुळें बँकांना नुकसान आलें तर त्यापासून त्यांचें कांहीं अंशीं संरक्षण व्हावें, हा योजनेचा हेतु आहे. मध्यवर्ती सरकारच्या वतीनें रिझर्व्ह बँक योजना अंमलांत आणणार आहे. तूर्त प्रयोगाची मुदत दोन वर्षें आहे. पहिल्या वर्षी योजनांत निवडक २१ जिल्ह्यांतील ५७ केंद्रांमधील ३०० बँक कचेऱ्या आणि १५ केंद्रीय सहकारी बँका येतील. दुसऱ्या वर्षी आणखी २१ जिल्हे असेच योजनेंत सामील केले जातील. गॅरंटीची रक्कम देण्याची अंतिम जबाबदारी मध्यवर्ती सरकारची आहे. दोन वर्षांचे अखेरीस ह्या प्रयोगाचा आढावा घेतला जाईल. गॅरंटीच्या रकमेचे दोन भाग रहातील. पाहिला भाग म्हणजे नुकसानीची जी रक्कम पूर्णतः भरपाई करण्याची हमी घेतलेली असेल, तिचा असेल. दुसरा भाग म्हणजे उरलेल्या नुकसानीचा ( जी नुकसानी धनको बँकेच्याबरोबर अर्धी अर्धी, भरपाई केली जाईल, तिचा ) असेल. गॅरंटी–घेण्यांत आल्याबद्दल शेंकडा ४ आणे असा कर्जाच्या रकमेवर चार्ज धनको बँकांना सोसावा लागेल. पूर्णतः नुकसानभरपाई २५,००० रु. पर्यंतच्या कर्जाच्या २०% ला लागू पडेल. त्यांपेक्षा अधिक कर्जाच्या १०% पर्यंतचीच ( किंवा ५०,००० रु. पर्यंतचीच ) पूर्ण गॅरंटी घेतली जाईल. गॅरंटीचा बोजा ५०,००० रु. पेक्षा जास्त असणार नाहीं. ह्यापेक्षा जास्त नुकसानी आली, तर ती ५० : ५० ह्या प्रमाणांत मध्यवर्ती सरकार व धनको बँक ह्यांनीं सोसावयाची आहे.



KM2/57

किर्लोस्कर

स्थापना १८८८

पावरवर चालणारा

उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स. गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी ( द. सातारा )




अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें — मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

## विहीर तगाई वाटपाचें काम

"विहीर तगाई वाटपाचें काम सरकारनें नुकतेंच लँड मॉर्गेज बँकेकडे सोंपविलेलें आहे. १९५८ च्या एप्रिलमध्यें प्रथम गुजरापर्यंत प्रयोगादाखल तेथील लँड मॉर्गेज बँकेकडे ही जबाबदारी सोंपविण्यांत आली. हा प्रयोग यशस्वी झाल्याचें पाहून गेल्या नोव्हेंबरमध्यें सर्वच मुंबई राज्यांत लँड मॉर्गेज बँकेकडे विहीर तगाईचें काम देण्यांत आलें.

"गुजरातमध्यें ३,८१८ विहिरी काढल्या असून त्यास ४६,६४,१७५ रुपयांचें कर्ज दिल्याचें समजून येतें. मराठवाड्यांत १५८९ विहिरींना २६,६५,९०० चें कर्ज दिलें गेलेलें आहे. तर जुन्या महाराष्ट्रांत १८९७ विहिरींना २४,५०,६७५ कर्ज दिलेलें आहे. यपिकी अहमदनगर जिल्हा लँड मॉर्गेज बँकेनीं ५१४ विहिरींसाठी ६,९१,४५० रुपयांचें कर्ज दिलें असून आपल्या बँकेनीं ४,५७,३५० रुपये कर्ज देऊन २९६ विहिरी झालेल्या आहेत. त्याचे खालोखाल धुळे, कोल्हापूर येथील बँकांचें काम असून पुणें बँकेनीं मात्र एका विहिरीस १५०० रुपये देऊन नव्यानेंच ही जबाबदारी स्वीकारल्याचें दिसून येतें. अशा प्रकारें आमच्या मुंबई लँड मॉर्गेज बँकेनीं मुंबई राज्यांत ७,३०४ विहिरींना एकूण ९७,८०,७५० रुपयांचें मांडवल देऊन विहीर तगाईचें काम यशस्वीपणें पार पाडण्यास मदत केलेली आहे.'

—नी. आ. कल्याणी,

चेअरमन, सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

## रुपयाची किंमत किती उतरली ?

लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांनीं, "रुपयाची किंमत उतरली असली तरी तीं भयदायक नाहीं; इतर देशांच्या मानानें हा उतार जास्त नाहीं", असें सांगितलें. १९४७-४८ चे मानानें रुपयाची किंमत २९% घसरली असल्याचें त्यांनीं मान्य केलें. चलनाची किंमत घसरण्याच्या वार्षिक गतींचे तुलनात्मक आंकडे असे आहेत:—फ्रान्स ६·८, जपान ४·५, ग्रेट ब्रिटन ४·३, दक्षिण आफ्रिका ३·९, कॅनडा २·५, अमेरिका १·८ आणि पश्चिम जर्मनी ७·७. दक्षिण अमेरिका खंडांतील कित्येक देशांच्या चलनांची किंमत १३ ते ३८% ह्या गतीनें उतरली आहे. तेव्हां भारतीय रुपया त्यामानानें कितीतरी मजबूत आहे. उत्पादनवाढ झाली, तरच रुपयाची किंमत सुधारूं शकेल; एरवीं नाहीं.

## भारतांत येणारांजवळील हिंदी चलनी नोटा

१० डिसेंबर, १९५९ नंतर भारतांत येणाऱ्या कोणासहि आपल्याबरोबर ७५ रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या हिंदी चलनी नोटा भारतांत आणतां येणार नाहींत. इराणच्या आखाताच्या आसपासच्या देशांत चालण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें खास चलनी नोटा काढल्या आहेत, त्या कितीहि आणल्या तरी चालतील. कस्टम्स अधिकाऱ्यांना त्यांचा तपशील मात्र द्यावा लागेल. १७ ऑक्टोबर, १९५८ पासून भारताबाहेर जाणाराला ७५ रुपयांपेक्षा ज्यास्त किंमतीच्या हिंदी चलनी नोटा बरोबर नेतां येत नाहींत; तीच मर्यादा भारतांत येणारास आतां लागू करण्यांत आली आहे. चोरट्या आयातीला आळा घालण्याचा हा आणखी एक प्रयत्न आहे.

## सिक्युरिटी कौन्सिलची निवडणूक

सिक्युरिटी कौन्सिलचे पांच कायम सभासद आहेत, ते म्हणजे अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स व नॅशनॅलिस्ट चीन हे होत. सहा सभासद युनायटेड नेशन्सच्या असेंब्लीनें निवडलेले असतात. जपानची मुदत ह्या वर्षअखेर संपत आहे; त्याच्या रिकाम्या होणाऱ्या जागेसाठी टर्की व पोलंड हे देश उभे आहेत. पण, निवडून येण्यासाठी लागणारें दोन तृतीयांशाचें मताधिक्य कोणासच मिळूं शकत नसल्यामुळें, पुनः पुनः मतें घेण्यांत येत आहेत. टर्की हा ब्रिटन-अमेरिकाच्या गटांत आहे व त्याला निवडून आणण्याची त्या गटाची पराकाष्ठा चालू आहे. पोलंडला रशियन गटाचा पाठिंबा आहे. अमेरिका व पोलंड ह्यांचे संबंध सुधारले आहेत व अमेरिका पोलंडला आर्थिक साहाय्य देत आहे. पण, टर्कीप्रमाणें पोलंडवर हुकमत चालणार नाहीं आणि अमेरिकेला सिक्युरिटी कौन्सिलमध्यें आपलें प्रभुत्व टिकवावयाचें आहे. येत्या जानेवारींत कॅनडाची जागा सिलोन घेणार असून त्यापुढील वर्षी ट्युनिशियाची जागा इजिप्त घेणार आहे. हे दोघे नवीन सभासद अमेरिकेला भरवशाचे वाटत नाहींत; म्हणून पोलंडच्या निवडणुकीस अमेरिकन गटाचा विरोध आहे. पोलंडला वास्तविक टर्कीपेक्षा ज्यास्त मतें मिळत आहेत.

## हुंड्याची २,००० रु. ची मर्यादा काढून टाकली

लोकसभेमध्यें हुंडा प्रतिबंधक बिल एप्रिल, १९५९ मध्यें मांडण्यांत येऊन तें जॉइंट कमिटीकडे तपशीलवार विचारासाठी सोंपविण्यांत आलें होतें. विवाहाच्या वेळीं कोणत्याहि पक्षानें दुसऱ्या पक्षास दिलेल्या बक्षिसांची, दागिन्यांची व कपड्यांची किंमत २,००० रुपयांपेक्षा अधिक होतां कामा नये, असें एक कलम मूळ बिलामध्यें आहे. ह्या कलमामुळें हुंडापद्धतीस मान्यताच दिल्यासारखें होत आहे, असें कमिटीचें मत झालें. विवाहाचे वेळीं किंवा नंतर मिळालेला हुंडा एका वर्षाचे आंत पत्नीच्या नांवें करण्यांत आलाच पाहिजे, अशी दुरुस्ती कमिटीनें सुचविली आहे आणि ह्या तरतुदींचा भंग करणारा कैदेसहि पात्र व्हावा अशी शिफारस केली आहे.

## चंद्रावर होटेल काढण्यासाठी अमेरिकेकडे मांडवलाची मागणी

भिलई येथील एका हिंदी माणसानें चंद्रावरती एक होटेल उघडण्याचें योजिलें आहे व त्यासाठी त्यानें भारतांतील अमेरिकन वकील मि. एलिस्वर्थ बंकर, ह्यांचेकडे मांडवलाची मागणी केली आहे. इंडो-अमेरिकन सोसायटीच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना मि. बंकर ह्यांनीं ह्या मागणीचा उल्लेख केला. भारतांतील लोकांच्या वाढत्या क्षितिजांचें हें उदाहरण आहे, असें ते म्हणाले. अमेरिकेकडे कोणी, काय व कशासाठी मागावें, ह्याला कांहीं धरबंधच उरलेला नाहीं, हें मात्र खरें.

## भिकाऱ्याला पत्नीचा १०० रुपयांचा जामीन

शंकर सखाराम नांवाच्या एका भिक्षेकऱ्याला बेगर्स ॲक्ट खालीं पकडून मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें उभें केलें, तेव्हां त्याच्या पत्नीनें १०० रुपयांची जामिनकीची रक्कम भरून त्याला जामिनावर सोडवलें. जामिनकीचा अर्ज मंजूर करतांना प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट म्हणाले, "आपण होऊन इन्कम टॅक्सचे फॉर्म भरणारे भिकारी आढळण्याचे दिवस आतां फार दूर नाहींत !"

## ८०,००० रुपयांचा चेक खोट्या माणसानें वटविला

१३ नोव्हेंबर, १९५९ रोजीं मुंबई येथील खादी कमिशनच्या चेक्स विभागानें मुंबईच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नांवें ८०,००० रुपयांचा चेक तयार केला होता आणि चेक्सवर सही करण्याचा अधिकार असणाऱ्या अधिकाऱ्यानें त्याचेवर सही केली होती. एका पार्टीला ती रक्कम पाठवावयाची होती व त्यासाठी तो चेक बँकेकडे पाठवून त्या रकमेचा ड्राफ्ट आणावयाचा होता. त्यानंतर, पाठविणेची रक्कम कमी करण्यांत यावी, अशी सूचना आलेवरून सही केलेला चेक अकौंटस खात्यांत ठेवण्यांत आला. "हा चेक बँकेकडे पाठविण्याचा नाहीं" अशी चिठ्ठी त्या चेकला लावण्यांत आली.

क्रॉस आणि ऑर्डर केलेला हा चेक अकौंटस खात्यांतून चोरीला गेला. १६ नोव्हेंबर रोजीं स्टेट बँकेच्या कौंटरवरती तो वटविला गेला. तो असा वटवितां यावा, ह्यासाठी मूळ पेयीचें (स्टेट बँकेचें) नांव खोडून टाकण्यांत आलें होतें आणि त्या जागीं खादी कमिशनच्या चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरचें नांव लिहिण्यांत आलें होतें. हा बदल अधिकृत करण्यासाठी चेक काढणाराची सही ह्या खाडाखोडीजवळ करण्यांत आली होती. ह्या चेकाबरोबर खादी कमिशनच्या नोटपेपरवर बँकेला लिहिलेलें एक पत्रहि होतें. अस्तित्वांत नसलेल्या एका इसमाला चेकची रक्कम देण्यास ह्या पत्रानें सांगितलें होतें आणि ह्या खोट्या इसमाची सही ओळख पटावी म्हणून ह्या पत्रावरहि घालण्यांत आली होती. ८०,००० रुपयांचा चेक अशा रीतीनें वटविला गेला असला पाहिजे, असें पोलिसांचें म्हणणें आहे. कांहीं जणांना ह्या बाबतींत अटक करण्यांत आली आहे.

---

दि तासगांव अर्बन को. बँक लि.

चेअरमन : तुकाराम वालचंद शहा.

मॅनेजर : वाय्. एन्. आरेकर.

अहवालाचे वर्षी शेअर भांडवलांत ५८० रु. ची व इतर फंडसमध्यें ५,७६३ रु. ची वाढ झाली. ठेवी १९,३७४ रु. नीं वाढून ३,२६,२३७ रु. झाल्या. बँकेनें २,४७,८१२ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत. एकूण नफा ६,६३० रु. झाला. ३% डिव्हिडंडला १,२०१ रु. लागले. १९६१ सालीं बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीनें १९५७ पासून रौप्यमहोत्सव निधीची तरतूद केलेली आहे.

---

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

दि. ३०-१०-५९ रोजीं नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सतरावी शाखा वावी ता. सिन्नर, येथें धनत्रयोदशीचे शुभमुहूर्तावर सकाळीं ९ वाजतां मा. भाऊसाहेब हिरे यांचे हस्तें उघडण्यांत आली.

---

भारतांतील चिनी नागरिक

भारतांत ११,९४२ चिनी नागरिक असल्याची ३१ ऑक्टोबर, १९५९ ची नोंद आहे. त्यांपैकी सर्वांत जास्त म्हणजे म्हणजे ८,१२७ बंगालमध्यें आहेत; मुंबईंत २,४०४ आहेत.

---

**जपानी निराश्रितांना मदत**—मध्य जपानला नुकताच वादळाचा फार मोठा तडाखा बसून हजारों माणसें निराश्रित झालीं. ह्या लोकांना मदत म्हणून भारतातर्फे ३,००० पौंड चहा जपानच्या परराष्ट्र खात्याच्या स्वाधीन करण्यांत आला. भारताचे जपानमधील वकील श्री. सिंग ह्यांनीं ही कामगिरी पार पाडली

## छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांसाठी सरकारी कर्जें

### स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशनचें कार्य

मुंबई सरकारनें मुंबई राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशनशीं करार केला असून त्यानुसार सदर कॉर्पोरेशन छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांबाबतच्या नियमांनुसार राज्य सरकारचें साहाय्य या खालीं, सरकारला न विचारताहि उद्योगपतींना व्यक्तिशः व कंपन्यांना १०,००० ते ७५,००० रुपयांपर्यंत व अपवादादाखल १,००,००० रुपयांपर्यंतच्या रकमेचें कर्ज मंजूर करूं शकते अथवा कर्ज देऊं शकते. एकाच वेळीं ५ लक्ष रुपयांची रक्कम, कर्जें वांटण्यासाठी सदर कॉर्पोरेशनच्या सुपूर्द करण्यांत येईल. अंदाजपत्रकांत वेळोवेळीं करण्यांत आलेल्या तरतुदीनुसार या रकमेंत भर घालण्यांत येईल.

सदर करारानुसार कॉर्पोरेशन राज्य सरकारचे एजंट म्हणून छोट्या उद्योगधंदे संस्थांकडून १०,००० ते ७५,००० रुपये रकमेपर्यंतच्या व अपवाददाखल एक लक्ष रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी करण्यांत आलेल्या सर्व अर्जांचा विचार करील. यांत जास्तीच्या कर्जासाठी करण्यांत आलेल्या अर्जांचाहि समावेश राहील व कॉर्पोरेशन सरकारला याबाबत न विचारताहि सर्व विभागासाठी कर्जें मंजूर करील व त्या कर्जाचें वाटप करील. सदर कॉर्पोरेशनला कर्जें मंजूर करण्यासंबंधीच्या अटींत बदल करण्याचा अधिकार आहे. परंतु त्यांत जो बदल करावयाचा तो छोट्या उद्योगधंद्यांना साहाय्य करण्याबाबत सरकारनें जीं सर्वसाधारण तत्त्वें व धोरणें ठरविलीं आहेत, त्यानुसार करावा.

आर्थिक साहाय्याकरितां केलेल्या अर्जांचा विचार करतांना, कॉर्पोरेशनला अग्रप्राधान्यासंबंधीचा क्रम पुढीलप्रमाणें निश्चित करण्याविषयीं सांगण्यांत आलें आहे. तो येणेंप्रमाणें :— (१) ४०,००० रुपयांहून कमी रकमेबाबतच्या कर्जासंबंधीचे अर्ज, (२) बृहन्मुंबई व अहमदाबाद यासारख्या अतिशय औद्योगीकरण झालेल्या शहरांखेरीज इतर विभागांतून आलेले अर्ज, (३) जे अतिशय गरजू व त्यांच्याजवळ साधनसामुग्री कमी असेल असे इसम किंवा तशा प्रकारच्या संस्थांकडून आलेलें अर्ज, (४) मुख्यत्वेंकरून निश्चित स्वरूपाच्या जमेकडील रकमा निर्माण करण्यासाठी कर्जाची मागणी करण्याकरितां आलेले अर्ज, (५) थोड्या अवधींत ठराविक अटी पूर्ण करणाऱ्यांकडून येणारे कर्जाच्या मागणीसंबंधीचे अर्ज. १०,००० रुपयांपासून ५०,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत कर्ज घेणाऱ्यांकरितां शेंकडा ३ हा व्याजाचा दर आकारण्यांत येईल आणि ५०,००० रुपयांपासून १ लक्ष रुपयांच्या मर्यादेपर्यंत कर्ज घेणाऱ्यांकरितां शेंकडा ५ हा व्याजाचा दर आकारण्यांत येईल.

करारनाम्याच्या एका अटीनुसार, कॉर्पोरेशनकडे कर्जाची वसुली करण्याचें काम राहील आणि शहर विभागाखेरीज बाकीच्या भागांमधील केंद्रांतील कर्जदारांना कर्जाच्या परतफेडीचे हप्ते व व्याजाची रक्कम सरकारी ट्रेझरीमध्यें भरावी लागेल आणि कॉर्पोरेशनकडे चलन पाठवावें लागेल. मुंबई शहरांत कर्जाचे हप्ते घेणें व व्याज स्वीकारणें हें काम कॉर्पोरेशनकडे राहील. सरकारी खात्यातर्फे अगोदरच ८,७५,००० रुपयांपर्यंत देण्यांत आलेल्या कर्जाच्या वसुलीचें कामहि सदर कॉर्पोरेशनकडे सोपविण्यांत येईल आणि शिवाय वितरित करण्यांत येत असलेल्या १३ लक्ष रुपयांच्या कर्जाच्या वसुलीचें काम या कॉर्पोरेशनकडे देण्यांत येईल.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

स्थापना १९१६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

| | | ३० जून, १९५१ अखेर |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५९ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ९१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.